महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक- कशिमं/वार्षिक परीक्षा-२०२६/सहा/ 569 दिनांक : 17/04/2026

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था (नोंदणीकृत)

विषय : **शासकीय उच्चकला वार्षिक परीक्षा २०२६**
विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती व इतर आवश्यक बाबींबाबत.

संदर्भ : १) मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं/वार्षिक २०२६/पाच/२२४, दिनांक १३.०२.२०२६
२) क्र. कशिमं/परीक्षा/ २०२६/पाच/५३५, दिनांक १३.०४.२०२६

विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, आपल्या कला परिसंस्थेमधून पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या उच्चकला वार्षिक परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती/अनुपस्थिती आपल्या लॉगिनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीमध्ये दररोज सादर करणे अनिवार्य आहे. तसेच, विद्यार्थ्यांची ऑफलाईन उपस्थिती स्वाक्षरीसह नोंदविण्याकरिता उपस्थितीपत्रक उच्चकला परीक्षेच्या लिंकवर https://mis.msbae.in या टॅब अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आले आहे. ऑफलाईन उपस्थितीपत्रक उत्तरपत्रिकांच्या गठ्ठयांसोबत मुल्यमापन केंद्रावर जमा करणे आवश्यक आहे. अन्यथा उत्तरपत्रिकांची तपासणी केली जाणार नाही.

०२. वार्षिक तसेच सत्र परीक्षेकरिता विद्यार्थी नोंदणी केलेल्या सर्व परीक्षा केंद्रांना/कला परिसंस्थांना सैध्दांतिक विषयांच्या परीक्षेसाठी लागणाऱ्या उत्तरपत्रिका संबंधित वितरण केंद्रावरुन दिनांक १५ ते १७ एप्रिल, २०२६ या कालावधीत हस्तपोच घेऊन जाण्याबाबत संदर्भिय क्र. २ वरील परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार, पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. जुन्या उत्तरपत्रिका अथवा उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत वापरता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

०३. उच्चकला वार्षिक परीक्षेकरिता नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र कला परिसंस्थेचे कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच, साहित्याच्या याद्या यापूर्वीच प्राचार्यांच्या लॉगीनवर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. परीक्षेकरिता आवश्यक असणारे Counductor Report, Supervisor Report, ABC व X Forms, Oral/Internal Marks Charts उच्चकला परीक्षेच्या https://mis.msbae.in या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत: माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.
१) विभाग प्रमुख, शिल्पकला व प्रतिमानबंध विभाग, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई
२) निवड नस्ती.

Scanned with OKEN Scanner